**"Waves of Covid -19, Omicron And Covid 19 Vaccination ……**

**Where do we stand ???....." (21 January 2022)**






# पीएनपी नाट्यगृहात कोविड-१९ : काल, आज आणि उद्या चर्चासत्र




कोविड काल, आज आणि उद्या चर्चा सत्रातील क्षण.

**अलिबाग** : पीएनपी वरिष्ठ महाविद्यालय वेश्वी अलिबाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रोटरी क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड काल, आज आणि उद्या चर्चा सत्राचे पीएनपी नाट्यगृहात आयोजन करण्यात आले होते. कोविडच्या नियमांचे पालन करून सदर कार्यक्रम फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून घेण्यात आला होता.

सदर कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन करण्याकरिता अलिबागमधील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. यामध्ये बालरोग तज्ज्ञ रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र चांदोरकर, हृदय रोग व मधुमेह तज्ञ डॉ. सचिन जायभाई, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत वाजे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे, रायगड आरोहेड लॅब सर्विसेस संचालक मंगेश रानवडे, रक्तपेढी तज्ञ डॉ. दीपक गोसावी. तर महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य, सत्राचे अध्यक्ष डॉ. ओमकार पोटे, प्राध्यापिका नम्रता पाटील, शेकापचे पुरोगामी युवा संघटनेचे अध्यक्ष विक्रांत वार्डे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्राध्यापक रविंद्र पाटील, प्राध्यापक दिनेश पाटील आणि शिक्षक वृंद उपस्थित होते. दीपप्रज्वलन डॉ. चंद्रकांत वाजे यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमात ज्यांनी पंडेमिक काळात कोरोना वॉरीयर म्हणून जबाबदारी निभावली त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. समज आणि गैरसमज यांच्या पलीकडे सध्याची पंडेमिक परिस्थिती गेली आहे. त्यामुळे आपल्या मनातील अडचणी नक्कीच दूर करण्याचा प्रयत्न तज्ञ डॉक्टरांनी केला. यामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. सचिन जायभाई यांनी संगितले की, २०१९ च्या नोव्हेंबरमध्ये परदेशातून वुहाण येथून कोरोनाची सुरुवात झाली. अत्यंत वेगाने पसरणारा हा विषाणू होता. संक्रमण भरपूर प्रमाणात झाले. तर डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कोरोनाची ही शापित पर्वणी आहे. लहान वयोगटातील मुलांवर याचा परिणाम कमी प्रमाणात झाला आणि झाला तरी ते प्रमाण सौम्य होते आणि प्रमाण वाढले तर त्या पेशंटला आम्हाला अलिबागमध्ये ठेवण्यासाठी हॉस्पिटल नव्हती. त्यामुळे त्या पेशंटना मुंबईकडे पाठवावे लागत होते. पण काहींना परिस्थितीच्या अभावी मुंबईत ॲडमिट करून घेणे शक्य नव्हते अशा जवळपास ६० रुग्णांना आमच्या हॉस्पिटलमध्ये सेवा दिली आणि आम्ही त्यांना बरे केले याचे समाधान वाटते. आता १५ ते १८ वयोगटातील मुलांचे लसीकरण सुरू आहे. याचा लाभ सर्व मुलांनी घ्यावा असा सल्ला दिला.

डॉ. चंद्रकांत वाजे स्त्री रोग तज्ज्ञ असल्याने प्रसूतीबाबत, प्रसूतीनंतर घेतलेली विशेष काळजी क्याबाबत विश्लेषण केले, गरोदर स्त्रियांमध्ये लस घ्यावी की नाही हा संभ्रम होता. पण लस घ्यावीच असा आम्ही सर्व डॉक्टरांनी सल्ला दिला होता. लस घेतल्यामुळे आपत्यावर कोणताही परिणाम होत नाही हे पटवून दिले. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांनी कोरोनाचा लोकांच्या मानसिकतेवर कशा प्रकारे त्याचा परिणाम झाला हे नमूद केले. कोविड फोबिया या बाबत माहिती दिली. विचार करून कोरोना होत नाही हा लोकांनी संभ्रम दूर ठेवावा. याच कारणास्तव भरपूर लोक डिप्रेशनमध्येसुद्धा गेले. समाज व्यवस्थेने थोड्याफार प्रमाणात का होईना कोरोनाचा स्वीकार केलेला पाहावयास मिळत आहे.

रक्तपेढी तज्ज्ञ डॉ. दीपक गोसावी यांनी आरटीपीसीआर टेस्ट, रॅपिड अँटीजेन टेस्ट बाबत माहिती दिली. टेस्टिंगबाबत भरपूर पॉझिटिव्ह निगेटिव्ह चर्चा झाल्या. सिटी व्हॅल्यू म्हणजे काय यांची माहिती दिली आणि कोरोनाबाबतीत लोकांचा कसा संभ्रम झाला होता हे स्पष्ट करून संगितले. निवेदक म्हणून मंगेश रानवडे यांनी योग्य प्रकारे जबाबदारी पार पाडली.

# कोरोना ही शापित पर्वणी

## डॉ. चांदोरकर यांचे प्रतिपादन

▶ पीएनपी नाट्यगृहात 'कोव्हिड १९ : काल, आज आणि उद्या' चर्चासत्र संपन्न


(छायाचित्रः अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कोरोना ही शापित पर्वणी असल्याचे प्रतिपादन रोटरी क्लबचे अध्यक्ष बालरोग तज्ज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी केले आहे. पीएनपी वरिष्ठ महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग तथा रोटरी क्लब, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोव्हिड १९ : काल, आज आणि उद्या' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आपल्या मार्गदर्शनात डॉ.चांदोरकर यांनी कोरोना काळातील वैद्यकीय भूमिकेसंदर्भातही माहिती दिली. ते म्हणाले की, कोरोनाचा लहान वयोगटातील मुलांवर कमी प्रमाणात परिणाम झाला. कारण ते प्रमाण सौम्य होते. पण जर कोरोना रुग्ण वाढले तर त्या रुग्णासाठी अलिबागमध्ये हॉस्पिटल नव्हते. यामुळे परिस्थितीभावी या रुग्णांना मुंबईकडे रवाना करावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. याशिवाय कोरोनासंदर्भात ६० हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवा देत असंख्य रुग्णांना बरे केले असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. तर १५ ते १८ वयोगटातील मुलामुलांचे लसीकरण करण्यात येत असून, त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही डॉ.चांदोरकर यांनी केले आहे.

स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत वाजे यांनी प्रसूतीबाबत, प्रसूतीनंतर घेतलेली विशेष काळजी काळजी याबाबत विश्लेषण केले. तर गरोदर स्त्रियांमध्ये लस घ्यावी की नाही, हा संभ्रम होता. पण लस घ्यावीच असा आम्ही सर्व डॉक्टरांनी सल्ला दिला होता. लस घेतल्यामुळे अपत्यावर कोणताही परिणाम होत नसल्याचे त्यांनी पटवून दिले.

याशिवाय, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांनी कोरोनाचा लोकांच्या मानसिकतेवर कशा प्रकारे त्याचा परिणाम झाला हे नमूद केले. कोव्हिड फोबिया याबाबत माहिती देताना लोकांनी कोरोनासंदर्भातील संभ्रम दूर ठेवण्याचे आवाहन केले. तर कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची आवश्यकता हृदयरोग व मधुमेह तज्ज्ञ डॉ. सचिन जायभाई यांनी प्रतिपादीत केली. तसेच रक्तपेढी तज्ज्ञ डॉ.दीपक गोसावी यांनी सिटी व्हॅल्यूबाबत माहिती दिली.

पीएनपी नाट्यगृहात संपन्न झालेला हा कार्यक्रम कोव्हिड नियमांचे पालन करून फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून घेण्यात आला. या कार्यक्रमास रायगड आरोहेड लॅब सर्विसेस संचालक मंगेश रानवडे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, सत्राचे अध्यक्ष डॉ. ओमकार पोटे, प्रा. नम्रता पाटील, शेकापचे पुरोगामी युवा संघटनेचे अध्यक्ष विक्रांत वार्डे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र पाटील, प्रा. दिनेश पाटील तथा शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निवेदकाची जबाबदारी मंगेश रानवडे यांनी पार पाडली.

> आपले आरोग्य हे आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीवर आधारलेले आहे. कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत तणावग्रस्त अवस्थेमुळे प्रतिकारशक्तीचा शीण झाल्याने मृतकांची संख्या वाढली. त्यामुळे जरी टेस्ट पॉझिटिव्ह आली तरी न घाबरता आपण बरे होणारच, या इच्छाशक्तीच्या जोरावर कोरोनावर मात करा.
>
> **- डॉ. अनिल डोंगरे, मानसोपचार तज्ज्ञ**